☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# पडोली पोलीसांची अवैध दारू तस्करांविरूध्द कार्यवाही ५२ लक्ष ६० हजार ५०० रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०३/०३/२०२० रोजी रात्रौ दरम्यान पडोली पोलीस स्टेशनला कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी यांना गोपणीय माहीती मिळाली की नागपूर कडुन चंद्रपूर कडे ट्रक क्र जीजे १८ एयू ८१९३ या वाहनात दारूची अवैध वाहतुक होत आहे. अशी माहीती मिळताच पो.नि. शेळके व पोलीस स्टाफने पडोली चौकात नाकेबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान खबरेप्रमाणे ट्रक क्र जीजे १८ एयू ८१९३ क्रमांकाचे ट्रक चालकास थांबवुन सदर ट्रकची अवैध दारूबाबत झडती घेतली असता नमुद ट्रकमध्ये १) ४२० खरड्याचे खोक्यात एकुण ४२००० नग ९० मिली नी भरलेल्या रॉकेट देशी दारूच्या शिश्या किं. ४२,००,०००/—रु., २) ०८ खड्र्याचे खोक्यात १९२ नग ५०० मिलीने भरलेल्या बियर टिनाचे कॅन किं. ४८,०००/—रु., ३) आरोपीचा एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल किं. १०००/—रु., ४) आरोपीचे अंगझडतीत नगदी ११,५००/—रु. व ५) १२ चक्का टाटा कंपनीचा ट्रक क्र जीजे १८ एयू ८१९३ किं. १०,००,०००/—रु. **असा एकुण ५२,६०,५००/—रु.** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी ट्रक चालक नामे युसुफ मन्नु अन्सारी वय २६ वर्षे, रा. भिवंडी ठाणे याचे विरूध्द पो.स्टे. पडोली अप क्र. ६३/२०२० कलम ६५(अ), ८३ म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करण्यात आली असुन पुढिल तपास पडोली पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक पडोली श्री. शेवाळे यांचे नेतृत्वात पोहवा. सुभाष कुळमेथे, सुरेंद्र खनके, चंदू ताजणे, नापोकॉ. स्वप्नील बुरीले, पोशि. सुमीत बरडे, भुषन टोंग या पोलीस पथकाने पार पाडली. सदरची उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबाबत डॉ. श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे हस्ते प्रोत्साहनपर बक्षिस आणि प्रशस्तीपत्र पथकातील अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रदान करण्यात आले आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


# सोनसाखळी चोरणाऱ्या आरोपीस रामनगर पोलीसांकडुन अटक

दिनांक ०४/०३/२०२० रोजी महिला फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन रामनगर येथे तक्रार दिली की, फिर्यादी हया सकाळी मॉर्नीग वॉक करून आपले घराकडे परत जात असतांना कोणीतरी अज्ञात पांढरे रंगाची टि शर्ट व फुलपॅन्ट घातलेल्या इसमाने फिर्यादीचे पाठीमागुन येवुन फिर्यादी महिलेच्या गळयातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी किं. २४,०००/—रु. ची जबरीने हिसकावुन पळुन गेला. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अपराध क्र. २४३/२०२० कलम ३९२ भा.दं.वि. अन्वये नोंद करण्यात आला.

गुन्हयाचे तपासादरम्यान फिर्यादी महिला व प्रत्यक्षदर्शी साक्षदार यांनी आरोपीचे केलेले वर्णन व गुप्त बातमीदाराचे खात्रीशिर खबरेवरून एका संशयीत इसमास ताब्यात घेवून त्यास सखोल विचारपूस केली असता त्याने सदरचा गुन्हा हा दुसऱ्या आरोपीत इसमासोबत मिळुन केला असल्याची कबुली दिल्याने १) साहील इस्माईल शेख वय १९ वर्षे, २) सुशील मुनेश्वर खोब्रागडे वय १९ वर्षे, दोन्ही रा. चंद्रपूर या दोघांनाही ताब्यात घेवुन गुन्हयात अटक करण्यात आली असुन आरोपींकडुन सदर गुन्हा करतेवेळी वापरलेले कपडे व तुटलेली सोन्याची साखळी किं. २४,०००/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक रामनगर श्री. प्रकाश हाके यांचे नेतृत्वात सपोनि. संतोष दरेकर, सफौ. प्रभुदास माहुलीकर, सुधीर जाधव, नापोशि. पुरूषोत्तम चिकाटे, पोशि. निलेश मुळे, माजीद पठाण या पोलीस पथकाने पार पाडली. सदरची उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबाबत डॉ. श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे हस्ते प्रोत्साहनपर बक्षिस आणि प्रशस्तीपत्र पथकातील अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रदान करण्यात आले आहे.

---